# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 22 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २२ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा समारोप – अधिवेशन यशस्वी झाल्याचा सरकारचा दावा
- गेल्या दोन वर्षांत मराठवाड्यात सात प्रकल्प पूर्ण करून ३८ दशलक्ष घनमीटर पाणी साठा निर्माण केल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती
- राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर, गृह तसंच ऊर्जा खातं मुख्यमंत्र्यांकडे, अजित पवार यांना अर्थ तर एकनाथ शिंदे यांना नगरविकास, गृहनिर्माण आणि सार्वजनिक उपक्रम विभाग
- मस्साजोग हत्या प्रकरणाच्या मुख्य सुत्रधारावर कारवाईची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

  आणि

- तूळजापूरचा पहिला राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार सामाजिक कार्यकर्त्या ममता सिंधुताई सपकाळ यांना जाहीर

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा काल समारोप झाला. आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या तीन मार्चपासून मुंबई इथं होणार होणार आहे. अधिवेशन कालावधीत विधानसभेत १३ विधेयकं संमत तर १५ विधेयकं पुनर्स्थापित करण्यात आली. तर विधानपरिषदेत चार विधेयकं संमत झाली, तर चार विधेयकं पुनर्स्थापित करण्यात आली. चार विधेयकं शिफारशीशिवाय विधानसभेकडे परत पाठवण्यात आली तसंच एक विधेयक संयुक्त समितीकडे पाठवण्यात आलं.

दरम्यान, हिवाळी अधिवेशन यशस्वी झाल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते काल नागपुरात पत्रकार परिषदेत बोलत होते. अधिवेशनाचा कालावधी कमी असला तरीही, ठरवलेलं कामकाज पूर्ण झाल्याचं त्यांनी नमूद केलं.

****

या अधिवेशनात सरकारने जनतेच्या तोंडाला पानं पुसल्याचा आरोप, प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले तसंच विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. ते काल नागपुरात पत्रकार परिषदेत बोलत होते. विदर्भ तसंच मराठवाड्याच्या जनतेला न्याय देण्यासाठी हिवाळी अधिवेशनात चर्चा होणं अपेक्षित होतं, मात्र अशी कोणतीच चर्चा झाली नसल्याचा आरोप पटोले यांनी केला. शेतकरी, कष्टकरी, तसंच उद्योगधंद्यांसाठी कोणताही निर्णय सरकारनं घेतला नसल्याची टीका अंबादास दानवे यांनी केली.

****

विरोधकांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल उत्तर दिलं. गेल्या दोन वर्षांत मराठवाड्यात सात प्रकल्प पूर्ण करून ३८ दशलक्ष घनमीटर पाणी साठा निर्माण केला. मराठवाड्यात ११ सिंचन प्रकल्पाला मान्यता दिली, कृष्णा मराठवाडा उपसा जलसिंचन योजनेलाही निधी पुरवल्याचं सांगताना, पश्चिम वाहिनी नद्यांचं पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्यासंदर्भात कामकाजाचा त्यांनी आढावा घेतला. मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाचा आराखडा

नव्याने केंद्राकडे पाठवला असून, त्यासंदर्भात पाठपुरावा करून हा प्रकल्प पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली. ते म्हणाले,

**संपूर्ण याचा आराखडा तयार करून केंद्र सरकारकडे आपण पाठवलेला आहे. आता केंद्र सरकारचा नवीन मिशन ज्यावेळेस त्या ठिकाणी तयार होईल, त्यावेळी पुन्हा एकदा आम्ही त्याचा पाठपुरा करू. आणि आता जे काही आपण जलजीवन मिशनचे अंतर्गत नेटवर्क तयार केलं, त्याच नेटवर्कचा उपयोग करून त्याला जे काही सोल नेटवर्क तयार करायचा ग्रेडच्या रूपानं तयार करण्याकरता केंद्र सरकारची मदत घेऊन ही मराठवाडा ग्रीड आपल्याला कशी पूर्ण करता येईल याचा देखील प्रयत्न आपण करू.**

उद्योग क्षेत्राबद्दल बोलतांना, गेल्या अडीच वर्षात मराठवाड्यात ३४ मोठे प्रकल्प आले, ७२ हजार ८३९ कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन सुमारे दीड लाखावर प्रत्यक्ष तसंच अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. लातूर इथल्या रेल्वे बोगी कारखान्यातून वंदे भारत रेल्वेच्या डब्यांची निर्मिती होणार असल्याकडे त्यांनी लक्ष वेधलं. टोयोटा किर्लोस्कर प्रकल्प कर्नाटकातून ऑरिक सिटीत आला, त्यामुळे १३ हजार लोकांना थेट रोजगार मिळाल्याचं सांगत, छत्रपती संभाजीनगर आणि जालना ही दोन शहरं उद्योजकांचा आकर्षण बिंदू ठरत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. ते म्हणाले...

**महाराष्ट्राज नेक्स्ट इंडस्ट्रियल मॅग्नेट इज छत्रपती संभाजीनगर अँड जालना. आज डीएमआयसीमध्ये आपण जो ऑरिक सिटी तयार केली, शेंद्रा बिडकीन या ज्या एमआयडीसी तयार केल्या, जागा शिल्लक नाही इतकी मागणी आहे. कारण समृद्धी महामार्गामुळे थेट पोर्ट कनेक्टिव्हिटी त्याला मिळालेली आहे आणि जालन्याला आपण ड्रायफ्रूट देखील करतो आहोत. याच्यामुळे अशी इकोसिस्टीम त्या ठिकाणी तयार झाली आहे की त्यातलं मराठवाड्याच्या विकासाकरता एक मोठं दालन या ठिकाणी उभं राहीलं.**

****

दरम्यान, महाराष्ट्राला प्रगत, समृद्ध करण्यासाठी महायुती सरकार अहोरात्र काम करेल, अशी ग्वाही, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. विधान परिषदेत नियम २५९ आणि २६० अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना ते काल बोलत होते. मराठवाडा आणि विदर्भात औद्योगिक विकास आणि सिंचनावर भर देणार असल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

राज्यात १२ जानेवारी पर्यंत सोयबीनची खरेदी सुरू ठेवणार असून, गरज पडली तर यात वाढ करण्यात येईल, अशी ग्वाही देखील शिंदे यांनी यावेळी दिली. राज्यात कापूस खरेदी केंद्रातून आतापर्यंत ३८ लाख १० हजार क्विंटल कापूस खरेदी झाल्याचं त्यांनी सांगितलं.

****

राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप काल जाहीर झालं. गृह तसंच ऊर्जा खातं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे ठेवलं असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अर्थ आणि उत्पादन शुल्क खातं तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नगरविकास, गृहनिर्माण आणि सार्वजनिक उपक्रम विभाग देण्यात आला आहे.

जलसंपदा विभागाची जबाबदारी राधाकृष्ण विखे पाटील आणि गिरीश महाजन यांच्याकडे विभागून देण्यात आली आहे. महसूल – चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण – हसन मुश्रीफ, उच्च आणि तंत्रशिक्षण – चंद्रकांत पाटील, स्वच्छता आणि पाणीपुरवठा – गुलाबराव पाटील, महिला आणि बालकल्याण – अदिती तटकरे, कृषी – माणिकराव कोकाटे, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण – प्रकाश आबिटकर, ग्रामीण विकास – जयकुमार गोरे, शालेय शिक्षण – दादा भुसे, मृदा आणि जलसंधारण – संजय राठोड, उद्योग आणि मराठी भाषा – उदय सामंत, पर्यटन – शंभुराज देसाई, बंदरे आणि मत्स्यव्यवसाय – नितेश राणे, क्रीडा तसंच वक्फ – दत्ता भरणे तर शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना सार्वजनिक बांधकाम खातं देण्यात आलं आहे. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता – मंगलप्रभात लोढा, पणन आणि राजशिष्टाचार – जयकुमार रावल, आदिवासी

विकास – अशोक उईके, पर्यटन, खनिकर्म आणि माजी सैनिक कल्याण मंत्रालय – शंभूराज देसाई, तर आशिष शेलार हे माहिती आणि तंत्रज्ञान, सांस्कृतिक खात्याचे मंत्री असतील.

**मराठवाड्यातल्या मंत्र्यांना मिळालेली खाती याप्रमाणे...**

**पंकजा मुंडे यांच्याकडे पर्यावरण आणि पशू संवर्धन, धनंजय मुंडे यांना अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अतुल सावे यांच्याकडे बहुजन विकास, नवीकरणीय ऊर्जा आणि दुग्धविकास, संजय शिरसाट यांना सामाजिक न्याय, बाबासाहेब पाटील यांना सहकार खातं देण्यात आलं आहे.**

**तर मेघना बोर्डीकर या महिला बालकल्याण, आरोग्य आणि कुटुंब कल्याण, ऊर्जा, आदी खात्यांच्या राज्यमंत्री म्हणून काम पाहतील.**

****

मस्साजोग हत्या प्रकरणाच्या मुख्य सूत्रधाराला सोडलं जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. पवार यांनी काल मस्साजोग इथं मृत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. या प्रकरणात जे जे दोषी आढळून येतील त्यांना फाशीची शिक्षा होईल, असं त्यांनी सांगितलं.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही काल मस्साजोग इथं देशमुख कुटुंबियांची भेट घेत सांत्वन केलं. शरद पवार यांनी परभणी इथंही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून परिसराची पाहणी केली. परभणी इथं आंदोलनादरम्यान दगावलेले सोमनाथ सूर्यवंशी तसंच रिपब्लिकन सेनेचे नेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबीयांची पवार यांनी भेट घेऊन, त्यांचं सांत्वन केलं.

****

पहिला राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार समाजसेविका ममता सिंधुताई सपकाळ यांना जाहीर झाला आहे. तुळजापूर इथल्या हिरकणी पुरस्कार संयोजक समितीनं काल ही घोषणा केली. येत्या १२ जानेवारीला मान्यवरांच्या हस्ते तुळजापूर इथं हा पुरस्कार ममता सपकाळ यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येईल.

****

निवडणुकीदरम्यान नागरिकांच्या सहभागासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी भारतीय माहिती सेवेतले अधिकारी संतोष अजमेरा यांना २०२४ चा आंतरराष्ट्रीय निवडणूक पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं आहे. डोमिनिकन रिपब्लिक इथं हा पुरस्कार सोहळा नुकताच पार पडला.

****

१९ वर्षाखालील महिलांच्या टी ट्वेंटी आशिया चषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना भारत बांग्लादेश दरम्यान सुरु झाला आहे. बांग्लादेशच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.

****

नांदेड जिल्ह्यातल्या बिलोली पंचायत समितीला आयएसओ मानांकन प्राप्त झालं आहे. जिल्ह्यात नांदेड, लोहा, मुदखेड आणि देगलूर पाठोपाठ आयएसओ मानांकन मिळवणारी बिलोली ही पाचवी पंचायत समिती ठरली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या हस्ते काल समितीला आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलं.

****

परभणी इथल्या अप्रिय घटनेच्या निषेधार्थ काल आंबेडकरी संघटनांच्या वतीने पुकारण्यात आलेल्या जालना बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला. शहरातून काढण्यात आलेल्या रॅलीत आमदार अर्जुन खोतकर यांच्यासह आंबेडकरी अनुयायांनी मोठ्या संख्येनं सहभाग घेतला.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भात केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ हिंगोली आणि कळमनुरी इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीनं निदर्शन करण्यात आली. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ केलेल्या आंदोलनात शहा यांच्या राजीनाम्याची मागणी झाली.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने काल ध्यान दिनाचं औचित्य साधून ध्यानधारणेविषयी जागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. योग अभ्यासक अनंत पंडित यांनी ध्यानसाधनेमुळे एकाग्रता वाढून तणाव कमी होतो असं सांगत, ध्यानाचं महत्त्व विशद केलं. या वेळी उपस्थित विद्यार्थी-शिक्षक-पालक यांनी ध्यानधारणेची प्रात्यक्षिकं केली.

****

रोटरी इंटरनॅशलच्या वतीने छत्रपती संभाजीनगर शहरात महाएक्सपो प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. यात विविध स्टॉल्ससह देहदान चळवळीची माहिती देणारं दालनंही आहे.

****